सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
**Formerly Pune University**

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
गणेशखिंड, पुणे–४११००७
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६२१०४८/९
ई–मेल : iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ - www.unipune.ac.in

**Internal Quality Assurance Cell**
**Ganeshkhind, Pune – 411007**
**Contact No. : 020-25621048/9**
**E-mail - iqac@unipune.ac.in**
**Website – www.unipune.ac.in**


अंगुहक/ ४८९/२०२५
IQAC/

दिनांक : ०८/१२ /२०२५
Date:

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/नोडल अधिकारी,
सर्व संलंग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये
आणि मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय – **AISHE पोर्टलवर अद्याप नोंदणी नसलेल्या महाविद्यालयांबाबत....** करणेबाबत..

संदर्भ– १. मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे उशिसं/सांख्यिकी/AISHE/महाविद्यालय नोंदणी/२०२५/E-1948353, दि. २७/११/२०२५ चे कार्यालयीन पत्र.

२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२३–२४/५४७५, दि. ०२/०५/२०२३.

३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२३–२४/७२९४, दि. २०/०६/२०२३.

महोदय/महोदया,

अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम अंतर्गत शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली, यांच्याकडून भारतातील तसेच महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सांख्यिकी माहितीची आवश्यकता असते. त्याअनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलंग्नित असलेल्या पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हयातील व दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था **AISHE** वेबपोर्टलव्दारे ऑनलाईन माहिती भरत असतात.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये/पूर्वी ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना राज्य सरकारकडून मान्यता व विद्यापीठातील शैक्षणिक विभागाकडून संलंग्नीकरण मिळालेले आहे अशा सर्व महाविद्यालये/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (**AISHE**) पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे असे उपरोक्त संदर्भीय प़त्रान्वये कळविण्यात आलले आहे.

परंतु अद्यापही शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये/पूर्वी ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना राज्य सरकारकडून मान्यता व विद्यापीठातील शैक्षणिक विभाग (संलंग्नता कक्ष) यांच्याकडून संलंग्नीकरण मिळालेले आहे अशा काही माविद्यालये/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) पोर्टलवर नोंदणी केली नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

तरी आपणांस विनंती की **शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये/पूर्वी ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना राज्य सरकारकडून मान्यता व विद्यापीठातील शैक्षणिक विभाग (संलंग्नता कक्ष) यांच्याकडून संलंग्नीकरण मिळालेले आहे अशा सर्व महाविद्यालये/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) पोर्टलवर लवकरात लवकर नोंदणी करून सहकार्य करावे.**

08/12/25

(प्रा. डॉ. विनायक जोशी)
संचालक
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष